**महा**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन उपक्रम)

**सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५**

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**पी.आर-३/सबसिडी/२७४०** **दिनांक : २०.०१.२०१६**

## वाणिज्य परिपत्रक क्र. २५७

**विषय :- राज्यातील यंत्रमागधारक ग्राहकांना पुरविण्यात येणा-या विजेच्या दरात सुधारणा करणेबाबत.**

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१७५/ऊर्जा-५ दि.०७.११.२०१५.
२) शासन शुध्दीपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१७५/ऊर्जा-५ दि.०३.१२.२०१५.

राज्यातील यंत्रमाग उद्योगांना चालना देण्याकरिता महाराष्ट्र शासनाकडून यंत्रमागधारकांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याचे धोरण कार्यान्वित आहे. सध्या यंत्रमागधारकांना शासनाच्या उपरोक्त दिनांक ५ मार्च , २०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले सवलतीचे दर लागू आहेत. वीज ग्राहकांना पुरविण्यात येणा-या विजेच्या दराची निश्चिती महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून केली जाते. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने त्यांच्या दिनांक २६ जून, २०१५ च्या आदेशान्वये दिनांक १ जून, २०१५ पासून सुधारित वीज दर लागू केलेले आहेत. सुधारित वीज दरामध्ये २७ अश्वशक्तीच्या आतील लघुदाब यंत्रमागधारकांच्या वीज दरामध्ये २७ अश्वशक्तीपेक्षा जास्त भार असणा-या यंत्रमाग ग्राहकांच्या दराच्या तुलनेत अधिक वाढ झाली आहे. सदर तफावत दूर करुन शासनाने संदर्भातील शासन निर्णयानुसार यंत्रमागधारकांच्या सवलतीच्या दरामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे. सदर सुधारित सवलतीचे दर नोव्हेंबर-२०१५ च्या देयकापासून यंत्रमागधारकांना लागू राहिल.

अ) राज्यातील यंत्रमागधारक ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या वीजेच्या दरात सवलत देण्यासाठी शासनाकडून सध्या जेवढया रक्कमेचे अनुदान देण्यात येते त्या मर्यादेपर्यंत अनुदान यापुढेही चालू राहील.

ब) उच्चदाब यंत्रमागधारकांना देण्यात येणारी सवलत यापुढे बंद करण्यात यावी.

क) २७ अश्वशक्तीपेक्षा कमी जोडभार असणा-या व २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक जोडभार असणा-या लघुदाब यंत्रमागधारकांना रु. २.६६ प्रती युनीट असा समान वीज दर आकारण्यात यावा.

ड) उपरोक्त सवलतीच्या दरासोबत लघुदाब यंत्रमागधारकांच्या दोन्ही प्रवर्गातील ग्राहकांना वाढीव स्थिर आकार भरावा लागेल.

इ) वीज दरातील सवलतीच्या दरा व्यतिरिक्त शासनातर्फे इंधन समायोजन आकारात देण्यात येणाऱ्या अनुदानानंतर देय होणारा इंधन समायोजन आकार किंवा अन्य प्रकारचा दंडात्मक आकार यंत्रमागधारक ग्राहकांनी १००% भरणे आवश्यक राहील.

ई) भविष्यात मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी मंजूर केलेला वाढीव वीज दर (स्थिर आकार व वीज आकार) यंत्रमागधारकांनी भरणे बंधनकारक राहिल.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

मुख्य अभियंता (वाणिज्य)

**प्रत माहितीस रवाना :-**

मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)

--- वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने यंत्रमाग ग्राहकांच्या देयकाच्या संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे.**